# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड

## प्रेसनोट ता. ०९/०२/२०२४

## कंपनीत गुंतवणुक करण्यासाठी विश्वासात घेवुन पर्सनल लोन काढुन फसवणुक करणारा गजाआड

## हिंजवडी पोलीस गुन्हे शोध पथकाची कामगीरी

मंगेश शामसुंदर दळवी वय.४४ वर्षे धंदा-खाजगी नोकरी रा.सी./६०३ व्दारका सनक्रेस्ट फेज-२ रहाटणी पुणे -४११०५७.मुळ पत्ता- मु,पोस्ट माजलगाव ता.माजलगाव जि.बीड यांनी तक्रार दिली की, दि. २५/०५/२०२१ रोजी ते आजपावेतो सी.२०८ वेस्टेरीया फोर्चुन,पुना बेकरी शेजारी सिल्वर स्पुन हॉटेलसमोर भुमकर चौक वाकड पुणे येथे आरोपी अमित शामराव माने यांनी स्वतःची टेकरीचेस प्रा.लि.नावाची ई लर्निंग कन्टेंड डेव्हलपमेंट सर्विस देण्याची व तसेच कि बोर्ड आणि संबधीत पुस्तके वितरण करण्याचा व्यवसाय असुन फिर्यादी यांना आरोपीने माझ्या व्यवसायात गुंतवणुक करा मी तुम्हाला २ ते ३ टक्के अधिक फायदा करुन देतो असे सांगुन आरोपीने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन एकुण ५४,१०,०००/- रुपयाची गुंतवणुक करण्यास भाग पाडले त्याप्रमाणे फिर्यादी यांनी गुंतवणुक केलेली पैसे व त्यावरील प्रॉफीट न देता त्यांची विश्वास संपादन करुन फसवणुक केली आहे म्हणुन दिनांक २४/०९/२०२३ रोजी हिंजवडी पोलीस ठाणेत गु.र.नं. ११००/२०२३ भादवि कलम ४०६,४२० गुन्हा दाखल होता. सदर आरोपी हा गुन्हा दाखल होण्याचे पुर्वीपासुन लपुन बसला होता.

यातील आरोपीने एकुण ७ मोबाईल सिमकार्ड वापरले होते व प्रत्येक वेळी नवीन सिमकार्ड मुळे व नवीन मोबाईल मुळे तो मिळुन येत नव्हता. राम गोमारे सहायक पोलीस निरीक्षक तसेच पो.हवा/६९४ शिंदे व पो.कॉ. २४०१ कांबळे यांनी केलेल्या तांत्रिक तपासावरुन सदर आरोपी हा लातुर येथे असल्याचे समजल्याने बापुसाहेब धुमाळ सहायक पोलीस उप निरीक्षक पो.नाईक १७४८ चंद्रकांत गडदे यांना लातुर येथे पाठवुन सापळा लावुन यातील आरोपी नामे अमित शामराव माने वय -३६ वर्षे,धंदा-नोकरी,पत्ता- प्लॅट नं.९०२,जॉयव्हिला सोसायटी,माण ता.मुळशी जि.पुणे.सध्या रा.प्लॅट नं.२०७,आर्चेड सोसायटी,पलवा खोणीगाव,तळेजा बायपास रोड कल्याण ठाणे.मुळगाव- सेलु ता.सेलु जि.परभणी यास ताब्यात घेवून त्यास सदर गुन्हयाचे कामी **दि. ३१/०१/२०२४ रोजी ०९/४० वा. अटक करुन पुढील तपासात आरोपीने फिर्यादी व इतर १३ साक्षीदार यांची खालीलप्रमाणे फसवणुक केली असल्याचे समोर आले आहे.**

१. मंगेश शामसुंदर दळवी -५४,१०,०००/-
२. वैभव शांताराम बावीस्कर यांची १,१६,१७,०८७/-
३. खंडु उत्तम चव्हाण ३८,६५,१९८/-
४. धीरज फुलचंद पाल - ७६,००,०००/-
५. योगेश विलास मोरे- १६,८०,०००/-
६. शुभांगी अण्णासाहेब भांगरे - १६,६०,६८५/
७. प्रियंका नंदकुमार शेटे - ५०,००,०००/-
८. संतोष शंकर शेलार - ३२,००,०००/-
९. सुजित लक्ष्मीकांत बुरसे -१,२०,००,०००/-
१०. मनोहर सुभाष सचगुरे - ६९,६०,६८९/-
११. सुधीर कौतीक भवर- १०,००,०००/-

१२. सुनिता सुधीर भवर- २२,००,०००।-
१३. राजेंद्र भाऊसाहेब भांगरे- १,७१,००,०००/-
**१४**.अमर गोविंद मुचेवाड- १२,००,०००/-
**१५**.प्रमोद पंढरीनाथ शेळके- १८,३१,५५२/-

**एकुण**-८,२३,२५,२११/- (आठ कोटी तेवीस लाख पंचवीस हजार दोनशे अकरा रुपयांची फसवणुक केल्याचे समोर आले आहे.

**सदर गुन्हयास महाराष्ट्र ठेवीदार (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे कायदा १९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे कलमवाढ करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.**

**सदरची कारवाई मा.श्री. विनयकुमार चौबे साो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. बापु बांगर, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग पिं चिं यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीराम पौळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तपास पथकाचे प्रमुख सहायक पोलीस निरीक्षक राम गोमारे, पोलीस अंमलदार बंडू मारणे, बाळकृष्ण शिंदे, नरेश बलसाने, बापुसाहेब धुमाळ, योगेश शिंदे, कैलास केंगले, कुणाल शिंदे, विक्रम कुदळ, अरूण नरळे, रितेश कोळी, सराटे श्रीकांत चव्हाण, चंद्रकांत गडदे, कारभारी पालवे, दत्ता शिंदे, अमर राणे, ओमप्रकाश कांबळे, सागर पंडीत, यांनी केली आहे.**

**(बापु बांगर)**
**पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२,**
**पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,**